Exh. 11/C

एस.सी.सी.नं.१७०/२०२६

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल**

**यांचे कोर्टात...**

**नामदेव आनंदराव पाटील** .......... **फिर्यादी**

**विरुद्ध....**

**सचिन मनोहर चव्हाण** .......... **आरोपी**

**यातील फिर्यादीतर्फे साक्षीदार यांचे ॲफिडेव्हीट खालीलप्रमाणे-**

## ॲफिडेव्हीट

मी ॲफिडेव्हीट करणार श्री. मुकुंद बाळासाहेब चौगले, व.व.-४२,धंदा-वैद्यकीय व्यवसाय, रा.धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, गडहिंग्लज रोड, गारगोटी, कोल्हापूर सत्य शपथेवर कथन करतो की, यातील एस.एस.सी.१७०/२०२६ मधील फिर्यादी नामदेव आनंदराव पाटील हे माझे व्यावसायिक संबंधामुळे परिचयाचे असलेने यातील आरोपी सचिन मनोहर चव्हाण याने फिर्यादी कडून व्यवसायासाठी व प्रापंचिक अडचणीसाठी दि.१२/०१/२०२४ इ. रोजी रोख रक्कम रू. ११,००,०००/- (अक्षरी रू. अकरा लाख) इतकी रक्कम रोख स्वरूपात हातउसणे घेतली होती. सदरची रोख रक्कम फिर्यादी म्हणजेच नामदेव आनंदराव पाटील यांनी आरोपी सचिन चव्हाण यांना माझे समक्ष रोख स्वरूपात अदा केलेली आहे व सदरची रक्कम २ महिन्यांच्या आत परतावा करणेच्या अटीवर आरोपीने तोंडी हमी देवून स्विकारलेली आहे.

Order
Read and
Record
JMFC, Kagal
02/07/2026

2/7/26
Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

फिर्यादी यांनी आरोपीकडून हातउसणे घेतलेल्या रक्कमेची वेळोवेळी मागणी केले नंतर आरोपीने चालढकल केलेली आहे. फिर्यादी यांनी खूपच तगादा लावला असता, फिर्यादी यांचेकडून घेतलेल्या रक्कमेच्या कायदेशीर परतफेडीसाठी फिर्यादी यांना आरोपी यांनी आरोपीचे खाते असले बँक ऑफ इंडिया, शाखा गारगोटी चा चेक नं.१३००४३, रक्कम रू.६,००,०००/- तसेच दुसरा चेक नं. १३००४० रक्कम रू. ५,००,०००/- इतक्या रक्कमेचे चेक वरील रक्कम लिहून दिली व त्यानंतर सदर दोन्ही चेकवरील नाव लिहीनेस फिर्यादी यांना सांगितले व सदर चेकवरील मजकुराची शहानिशा करून सदर चेकवर आरोपी यांनी फिर्यादी व मी व माझेसोबत रोहित जयसिंग कुंभार असे आमचे तिघांचे समक्ष चेक सही करून दिला व सदर चेक वटून फिर्यादी यांना फिर्यादी यांनी दिलेली कायदेशीर रक्कम परत मिळणार यांची खात्री व हमी दिली. सदर चेक नमुद तारखेवर दि.०६/०१/२०२६ इ. रोजी आरोपीने फिर्यादी यांना बँकेत जमा करणे विषय विनंती केली.

आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडून व्यवसायासाठी व प्रापंचिक अडचणीसाठी स्विकारलेल्या हातउसणे रक्कमेचा संपूर्ण व्यवहार माझे समक्ष झालेला असून आरोपीने रक्कम परतफेडीकरीता अदा केलेले धनादेश माझे समक्ष सही करून दिलेले आहेत.

कोल्हापूर | मे. जा. व्हावे

दि.०२/०७/२०२६ | फिर्यादी

श्री. मुकुंद बाळासाहेब चौगले

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

# प्रतिज्ञा

मी श्री. मुकुंद बाळासाहेब चौगले, व.व.-४२,धंदा-वैद्यकीय व्यवसाय, रा.धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, गडहिंग्लज रोड, गारगोटी, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद अर्जामधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा असे

कागल

दि. ०२/०७/२०२६ — प्रतिज्ञा करणार

यातील प्रतिज्ञा करणार यांना ओळखतो.

ॲड. जान्हवी नामदेव पाटील

Solemnly Affirmed before me by
Shri Mukund Balasaheb Chogule
Age 42 of Gargoti who is
identified by Shri J. N. Patil Adv
.........whom I know personally
Dated :- 2/7/26

Assistant Superintendent

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA



मुकुंदराव बाळासाहेब चौगले
Mukundrao Balasaheb
Chougale
जन्म तारीख/ DOB: 19/05/1983
पुरुष / MALE

2059 1925 3889

माझे आधार, माझी ओळख

भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण
UNIQUE IDENTIFICATION AUTHORITY OF INDIA

आधार

पत्ता:
बाग गल्ली, दारवाड,
निल्पण, कोल्हापूर,
महाराष्ट्र - 416223

Address:
Bag Galli, Darwad, Nilpan,
Kolhapur,
Maharashtra - 416223

1947
1800 300 1947
help@uidai.gov.in
www.uidai.gov.in
P.O. Box No.1947,
Bengaluru-560 001

MADKE
AJIT
BHISHMA

Digitally signed by
MADKE AJIT
BHISHMA
Date: 2026.07.02
17:45:01 +0530